सरकार वि. शेख मजहर वगैरे
निशाणी क्र.५

**सरकारतर्फे साक्षदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी सुरु**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव : मित्तल सतीशसिंग सोलंकी
वय : २५ वर्षे,
धंदा : खाजगी काम
राहणार : प्लॉट नं.२४, बापुनगर, नागपूर.

**सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकिल श्रीमती गोगे यांचा पुकारा केला असता ते गैरहजर**

**सरतपास न्यायालयामार्फत**

१. सन २०१४ मध्ये मी शासकीय पॉलीटेक्नीकमध्ये प्रथम वर्षाला शिकत होतो. मी बसने जाणे-येणे करायचो. सदर घटना ही सन २०१४ ची आहे. तारीख व महिना मला काही आठवत नाही. साधारण रात्री ८.०० वाजेची वेळ होती. तेव्हा मी माझे मोठे बाबा हरीसिंग सोलंकी यांचेकडे बापूनगर येथे राहत होतो. मी माझा मोबाईल रिचार्ज मारण्यासाठी घराजवळील उज्वल शाळेजवळ असलेल्या एका दुकानामध्ये गेलो होतो. रिचार्ज करून मी परत येण्यास निघालो व मित्राशी बोलत-बोलत घराकडे येण्यास निघालो. मी उज्वल शाळेसमोर पोहचलो तेव्हा तेथे अंधार होता. तेव्हा एका पॅशन दुचाकी वाहनावर दोन इसम आले व त्यांनी माझा मोबाईल हिसकावला व ते पुढे गेले. तेव्हा मी बघीतले त्यांची पॅशन गाडी होती. तेवढयात पाठीमागून माझा एक ओळखीचा त्याचे नाव मला माहिती नाही तो स्पलेंडर गाडीवर आला. त्याने मला विचारणा केली असता मी त्याला माझा मोबाईल हिसकावून घेतल्याचे सांगीतले. त्यांनी मला पाठीमागे बसविले व आम्ही त्यांचा पाठीमागे गेलो. तेव्हा ते दोन इसम नेहरूनगर झोन भागात गाडीवरून पडले. गाडी तेथेच सोडून ते पळून गेले. तेव्हा मी त्यांची पॅशन गाडी घेवून घरी गेलो. मी वडीलांना सांगीतले. वडीलांना घेवून मी पॅशन गाडीसह पोलीस ठाण्यात गेलो. तेथे मी फिर्याद दिली व पॅशन गाडी पोलीस ठाण्यात जमा केली. मला आता दाखविलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६** देण्यात येते. तसेच आता मला दाखविलेली छापील प्रथम खबर तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७** देण्यात येते.

२. पोलीसांना मी घटनास्थळ दाखविले.

३. सहा महिन्यानंतर मला माझा मोबाईल पोलीस ठाण्यामार्फत परत मिळाला. सदर मोबाईल हा मायक्रोमॅक्स गोल्ड कंपनीचा पांढ-या रंगाचा होता. तो मोबाईल डयुल सिमचा होता. सदर मोबाईल आता खराब होवून घरी पडलेला आहे.

**उलट तपासणी आरोपींतर्फे वकील श्री. सी.डी. बोकडे यांचा पुकारा केला असता ते गैरहजर, आरोपी क्र.१ व २ सुध्दा गैरहजर, त्यामुळे उलटतपास नाही.**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

(कि.कां. शाह)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दि.२६.०९.२०२२